**मेक इन इंडिया धोरणाअंतगर्त बनविलेला पहिला एस्केलेटर (सरकता जीना) पुणे मेट्रो मध्ये कार्यांन्वयीत**.



भारत सरकारने स्थानिक उद्योग, व्यवसाय व नोकरी वाढवण्यासाठी मेक इन इंडिया (भारतामध्ये उत्पादित करा) धोरण आणले आहे. या धोरणाअंतगर्त शासकीय, निमशासकीय व उपक्रमासाठी लागणारे सयंत्रे, विद्युत - यांत्रिकी उपकरणे ही भारतात उप्तादित केलेली असावीत असे निर्देश दिले आहेत. त्या निर्देशांची अंमलबजावणी महामेट्रोमध्ये कटाक्षाने सुरु आहे.

मेट्रो स्थानकांमध्ये प्रवाश्याना कॉनकोर्स लेव्हल आणि प्लॅटफॉर्म लेव्हल येथे जाण्यासाठी एस्केलेटर लावण्यात येत आहेत. पुणे मेट्रोच्या एकूण ३० स्थानकांमध्ये १६६ एस्केलेटर लावण्यात येणार आहेत. या एस्केलेटरमुळे प्रवाश्यांची स्थानकांमध्ये जलद वाहतूक करणे शक्य होणार आहे. पुणे मेट्रोला लागणारे १६६ एस्केलेटर खरेदी करण्यासाठी मेक इन इंडिया धोरणाअंतगर्त ५० टक्के पेक्ष्या जास्त समभाग भारतात उत्पादिले असावेत अशी अट घालण्यात आली होती. त्या अटीची पूर्तता करून चाकण येथे कारखाना असणाऱ्या शिंडलर कंपनीने पहिला एस्केलेटर बनविला आणि पुणे मेट्रोच्या संत तुकाराम नगर स्थानकात त्याचे कार्यांन्वयन करण्यात आले.

अशारितीने प्रथमच भारतात बनविण्यात आलेला पहिला एस्केलेटर संत तुकाराम नगर या स्थानकात लावण्यात येऊन तो कार्यांन्वयीत करण्यात आला. या एस्केलेटरमध्ये अत्याधुनिक अश्या सर्व प्रकारच्या सुविधा उपलब्ध आहेत. आपातकालीन परिस्थितीमध्ये या एस्केलेटरचे काम थांबविण्यासाठी ३ ठिकाणी इमर्जन्सी स्टॉप बटन देण्यात आले आहे. या एस्केलेटरमध्ये प्रवाश्यांच्या संख्येनुसार २ प्रकारचे वेग देण्यात आले आहेत.

याप्रसंगी महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. ब्रिजेश दीक्षित यांनी म्हंटले आहे की, ' महामेट्रो नेहमीच गुणवत्तापूर्वक उत्पादन केलेली भारतीय उपकरणे वापरण्यासाठी प्रयत्नशील आहे. भारतात निर्मिलेला पहिला एस्केलेटर संत तुकाराम नगरमध्ये कार्यांन्वयीत करण्यात आला हि महामेट्रोसाठी गौरवपूर्ण बाब आहे'.